दिनविशेष

३० जुलै

**अंतरराष्ट्रीय**

२००६ – श्रीलंकेच्या वायुसेनेने लिट्टेच्या एका ठिकाणावर हल्ला करुन ४० बंडखोरांना ठार केले.

**राष्ट्रीय**

२००६ – राज्यातील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्यावरून सरकार आणि पाकिस्तानच्या विरोधात निदर्शने करण्यासाठी श्रीनगरला जाणाऱ्या ८० शिवसैनिकांना पठाणकोट राजमार्गावर पोलिसांनी ताब्यात घेतले.

**जन्म**

१९७३ – सोनू निगम, भारतीय गायक.

निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....

# दैनिक निशस्त्र योध्दा

निशस्त्र योध्दा LIVE मराठी – आवाज तुमचा, लढा आमचा!

मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com

मेहकर | गुरूवार । ३० जुलै २०२६ । वर्ष–पहिले । अंक क्र. १३३ । पृष्ठे–४ । किंमत–४ रू. बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द

## वीकेंडला माळशेजला जाताय ? थांबा! रस्ता खचल्याने घाट आणखी ३–४ दिवस राहणार बंद; प्रशासनाचा महत्त्वाचा इशारा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**ठाणे:** पावसाळ्यात धबधबे आणि हिरवाईचा आनंद घेण्यासाठी माळशेज घाटाकडे जाण्याचा विचार करत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. मुसळधार पावसामुळे करंजाळे गावाजवळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील रस्ता मोठ्या प्रमाणात खचल्याने माळशेज घाटातील वाहतूक आणखी किमान तीन ते चार दिवस बंद राहणार आहे. त्यामुळे पर्यटकांनी सध्या माळशेजकडे जाण्याचे नियोजन टाळावे आणि पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

करंजाळे गावाजवळ नव्याने काँक्रिट करण्यात आलेल्या रस्त्याचा सुमारे १०० मीटरचा भाग पाच ते सहा फूट खोलपर्यत खचल्याने हा मार्ग पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून दुरुस्तीचे काम सुरू असले, तरी ते पूर्ण होण्यासाठी आणखी काही दिवस लागणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे सध्या या मार्गावरून वाहतूक सुरू होण्याची शक्यता नाही.

## नीटच्या फेरपरीक्षेचा पेपर तीन दिवस आधी गुजरातमध्ये फुटला, स्क्रीन शॉट पोस्ट करत रोहित पवारांचा आरोप

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीने आंदोलन उभं केलं होतं. या प्रकरणात धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. दरम्यान नीटचा पेपर फुटल्यानंतर फेरपरीक्षा घेण्याची वेळ सरकारवर आली होती. आता नीटच्या फेरपरीक्षेचा पेपर गुजरातमधून फुटल्याचा आरोप रोहित पवार यांनी पोस्टमध्ये केला आहे आणि त्याचे पुरावेही आपल्या पोस्टमध्ये सादर केले आहेत. एवढंच नाही तर तपास यंत्रणांनी यासंदर्भात कुठल्याही दबावाला बळी न पडता माहिती द्यावी असंही म्हटलं आहे.

पेपर लीक झाल्यानंतर जी नवीन फेरपरीक्षा घेण्यात आली त्या परीक्षेचा पेपर देखील ३ दिवस आधीच गुजरातमधून फुटल्याच्या बातम्या समोर येत आहेत. हे सत्य असेल तर खूप अवघड आहे..! तपास यंत्रणानी यासंदर्भात त्वरित खुलासा करावा आणि पेपर फुटला असेल तर कुठल्याही दबावाला बळी न पडता यामधील रॅकेट उघडकीस आणावं, ही विनंती! या पेपरफुटीसंदर्भात पुढं आलेले स्किन शॉट, मेल, संभाषण हे सगळं सोबत दिलेल्या लिंकवर गेल्यास पहावयास मिळेल.

रोहित पवार यांनी आपल्या ट्विटसोबत काही डॉक्युमेंट्स सुद्धा जोडले आहेत आणि त्यासोबत एक मेल सुद्धा जोडला आहे आणि या सर्व कागदपत्रांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. देशभरामध्ये नीट परीक्षेवरून रणकंदन माजलं असून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला आहे. त्यानंतर केंद्र सरकारकडून सुद्धा नव्याने जो कायदा २०२४ मध्ये करण्यात आला होता, त्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत आणि तो कायदा संसदेमध्ये मांडण्यात आला असून या कायद्यावर चर्चा सुरू असून विरोधकांनी सुद्धा केंद्र सरकारला पेपर फुटीवरून घेरलं आहे. त्यामुळे आता फेरपरीक्षेचा सुद्धा पेपर फुटला गेला असेल तर पुन्हा एकदा विरोधक कॉक्रोच जनता पार्टी सुद्धा आक्रमक होणार का? हा सुद्धा आता मुद्दा उपस्थित झाला आहे.

## ऑगस्ट महिना वाढवणार टेन्शन!

**नवी दिल्ली** :यंदाच्या पावसाळ्यात जून महिन्यात पडलेल्या तुटपुंज्या पावसामुळे चिंतेत सापडलेल्या शेतकऱ्यांना जुलैच्या दमदार पावसाने मोठा दिलासा दिला. जुलै महिन्यातील मुसळधार बरसलेल्या सरींमुळे देशभरातील पावसाची तूट भरून निघत सरासरी ओलांडली गेली आहे. मात्र, आता हवामान विभागाकडून आणि स्कायमेटकडून एक महत्त्वाची अपडेट समोर येत असून, येणारा ऑगस्ट महिना आपल्यासोबत नवीन आव्हाने घेऊन येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मान्सूनमधील खंड आणि प्रशांत महासागरात अधिक तीव्र होत असलेला 'अल निनो' यांचा प्रभाव आगामी काळात पावसाची गणितं बिघडवण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सध्या उत्तर आणि मध्य भारतात मान्सूनचा जोर अत्यंत तीव्र झाला असून, आगामी ३ ते ४ दिवस अनेक राज्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेला तीव्र कमी दाबाचा पट्टा आता मध्य भारताच्या दिशेने सरकला आहे.

# आता शेवटचं लढायचं, तुकडाच पाडायचा!

## मनोज जरांगेंकडून २९ ऑगस्टपासून मराठा आरक्षण आंदोलनाची घोषणा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**मुंबई :** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी बोलताना म्हटले की, मराठ्यांना वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. कधी काळी समाज एकवटला त्यामुळे आपल्याला काळजीपूर्वक पुढं जायचं. २९ ऑगस्टला ३ वर्ष पूर्ण होत आहेत. आपल्याला जर कोणी वेड्यात काढत असेल त्यामुळे तुम्हाला बोलावलं. २९ ऑगस्ट रोजी पुन्हा शेवटचं निर्णायक आंदोलन करणार आहे. मनोज जरांगे पाटील यांची अंतरवालीतून घोषणा केली. त्यांनी थेट पुन्हा शेवटच्या आंदोलनाची घोषणा केली.सरकार ५८ लाख नोंदीचे प्रमाणपत्र देत नाही म्हणून एकदम मोठं निर्णायक आंदोलन करायचे आहे. ज्यांना माहित आहे की, आपल्या नोंदी सापडल्या त्यांनी तात्काळ अर्ज करा.

पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, समाजातील लेकरांच हाल होत आहे, गेल्या तीन वर्षापासून रक्त जळतोय म्हणून समाजाच्या लेकरांसाठी शेवटचा निर्णायक आंदोलन करणार आहे. एकानेही घरी थांबायचं नाही, ५८ लाख नोंदीचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय सोडायचं नाही. हैद्राबाद गॅझेटीयर दिलं तर मग प्रमाणपत्र का दिल नाही. मराठ्यांना टार्गेट कश्यामुळे करता, आधी तुम्ही स्थानिक चौकशी अहवाल आणला. आता तुकडा पडल्याशिवाय राहणार. हैद्राबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र घेतल्याशिवाय आता थांबणार नाही. २९ ऑगस्टपासून जोपर्यंत आंदोलन चालणार आहे, तो पर्यंत वेळ द्या. सर्वापक्षीय नेत्यांच्या मुलांना आरक्षण लागणार आहे. २८ ऑगस्टपर्यत हैद्राबाद गॅझेट नुसार प्रमाण पत्र द्या, असा अल्टीमेटम जरांगे पाटील यांचा सरकारला दिला आहे.

समाजाला वेड्यात काढण्याचे काम सुरू आहे. आपल्याला २९ ऑगस्टला शेवटचं खूप मोठ निर्णायक आंदोलन करायचं आहे, आपल्या ५८ लाख नोंदी राज्यात सापडल्या. त्यांना वारंवार सांगतो त्यांचे प्रमाणपत्र द्या. सरकार नोंदी प्रमाणे प्रमाणपत्र देत नाही म्हणून आंदोलन करण्यात येणार आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांनी अर्ज दाखल करा. तीन वर्ष समाजाच्या कल्याणासाठी रक्त जळतोय. मला निर्णायक शेवटच आंदोलन करायचे आहे. एक तर ते जातील नाहीतर मी जाईल. २९ ऑगस्ट ला कोणीही घरी थांबायचे नाही. आपल्याला हैदराबाद गॅझेट दिले, प्रमाणपत्र कधी द्यायचे. सरकारला प्रश्न करत जरांगे म्हणाले, हैदराबाद गझेटीयर दिले, प्रमाणपत्र कधी देता? फडणवीस साहेबांनी मराठ्यांची लेकरं टार्गेट केले, असंही पुढे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

तीन चार महिने झाले प्रमाणपत्र दिले नाहीत. २९ ऑगस्टपासून जोवर आंदोलन चालेल तोवर वेळ द्या. माझे सगळ्या नेत्यांना आवाहन आहे. राष्ट्रवादी, शिवसेना, कॉंग्रेस, सर्वाच्या मुलांना कार्यकर्त्यांना आरक्षण लागणार आहे. हैदराबाद गझेटियरनुसार २८ ऑगस्टच्या आत प्रमाणपत्र द्या नाहीतर २९ ऑगस्ट पासून आंदोलन सुरू करणार आहे, सातारा संस्थान, कोल्हापूर, औंध, पुणे, गॅझेटीयर लागू करण्याची मागणी करत आहोत, ते का घेत नाहीत. तुमच्या(सरकारच्या ) श्रेय वादाच्या लढाईत मराठ्यांचा बळी जात आहे. तीन वर्ष झाले केसेस मागे घेऊ म्हणतात, आम्हाला मारून आमच्यावर केसेस का? सगळ्या केसेस मागे होईपर्यत २९ ऑगस्टचे आंदोलन मागे नाही ओबीसींच्या सर्व सुविधा मराठ्यांना लागू केल्या. त्यांनी काढलेल्या उीं मध्ये पहिली पासून सर्व सुविधा दिल्या, आज परिस्थिती अशी आहे की, एकही सुविधा सुरू नाही, ओबीसी प्रमाणे सोयी सुविधा सुरू केल्या नाहीत. या सोयी एकाही शाळेला नाहीत. कोण कोणाला मुर्खात काढतेय हेच कळेना, अधिकारी सरकारला की सरकार अधिकाऱ्यांना कळत नाही, असंही जरांगेंनी म्हटलंय.

>> पान २

## गुरुपौर्णिमेनिमित्त शेगावात भाविकांची प्रचंड गर्दी; गजानन महाराजांच्या दर्शनासाठी लाखोंची उपस्थिती

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** गुरुपौर्णिमेनिमित्त जिल्ह्यातील संतनगरी शेगाव येथील श्री संत गजानन महाराज समाधी मंदिरात आज (२९ जलै) भाविकांची प्रचंड गर्दी झाली आहे. विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पवित्र स्थळी दिवसभरात लाखो भाविकांनी समाधीस्थळी नतमस्तक होत संत गजानन महाराजांचं दर्शन घेतलं. राज्यभरातून भाविक दाखल झाल्यानं संपूर्ण शेगाव नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली.

गुरूपौर्णिमेनिमित्त संत गजानन महाराजांना गुरुस्थानी मानणाऱ्या हजारो भाविकांनी पहाटेपासूनच मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मलकापूर ते शेगाव अशी सुमारे ७० किलोमीटरची पायी दिंडी शेगावात दाखल झाली. श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट, मलकापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारी ही दिंडी गेल्या १९ वर्षापासून गुरुपौर्णिमेनिमित्त शेगावला येत आहे. यंदाच्या दिंडीत महिला आणि पुरुष मिळून सुमारे ९०० ते १००० वारकरी सहभागी झाले होते. तीन दिवसांचा पायी प्रवास करत 'गण गण गणात बोते'चा जयघोष, भजन आणि नामस्मरण करत वारकरी मोठ्या भक्तिभावाने शेगावात दाखल झाले.

श्री संत गजानन महाराजांचं शेगाव हे श्रद्धा, भक्ती आणि साधनेचं प्रमुख केंद्र मानलं जातं. गुरुपौर्णिमेनिमित्त महाराजांना गुरुस्थानी मानणारे लाखो भाविक समाधी मंदिरात दर्शनासाठी दाखल झाले आहेत. दिवसभर दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून भाविक शांतपणे आणि संयमाने दर्शनाचा लाभ घेत आहेत. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी मंदिर व्यवस्थापनाकडून दर्शन, स्वच्छता, सुरक्षा आणि गर्दी नियोजनाच्या दृष्टीने आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे दर्शन प्रक्रिया सुरळीत सुरू आहे. यंदाही गुरुपौर्णिमेनिमित्त लाखो भाविकांनी शेगावात हजेरी लावल्यानं संतनगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली आहे. संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी आणि आशीर्वादासाठी राज्यभरातून आलेल्या भाविकांमुळे संपूर्ण परिसरात उत्साह आणि भक्तीचं वातावरण पाहायला मिळत आहे.

## पोलिसांच्या ताब्यातील प्रत्येक मृत्यू आता 'कोठडी मृत्यू'च!; राज्य सरकारचा निर्णय

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** पोलीस कोठडीतील मृत्यूच्या प्रत्येक प्रकरणात तपास अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि जबाबदार व्हावा, यासाठी गृह विभागाने सर्वसमावेशक मार्गदर्शक नियमावली जारी केली आहे. नवीन फौजदारी कायदे तसेच सर्वोच्च न्यायालय आणि मानवाधिकार आयोगाच्या विविध निर्देशांना अनुसरून ही नवी नियमावली तयार करण्यात आली आहे. यापुढे आरोपी पोलिसांच्या प्रत्यक्ष कोठडीत असो किंवा चौकशीसाठी अप्रत्यक्ष ताब्यात असो, अशा स्थितीत मृत्यू झाल्यास तो 'कोठडी मृत्यूच' गणला जाणार असून, संपूर्ण तपासाची मदार वैज्ञानिक व डिजिटल पुराव्यांवर असणार आहे.

नव्या नियमावलीनुसार, मुंबईतील कोठडी मृत्यूच्या प्रकरणांचा तपास गुन्हे शाखेकडे, तर राज्याच्या अन्य भागांतील प्रकरणांचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवणे बंधनकारक करण्यात आले आहे. कोठडीत मृत्यू घडल्यास संबंधित पोलीस ठाण्याने घटनास्थळ तात्काळ सील करून सुरक्षित करणे, 'सीसीटीएनएस' प्रणालीमध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करणे आणि २४ तासांच्या आत राष्ट्रीय व राज्य मानवाधिकार आयोग तसेच नागरी हक्क संरक्षण विभागाला तात्काळ अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.

नियमावलीनुसार कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घटनास्थळाचा बहुकोनीय व्हिडिओ चित्रीकरणासह पंचनामा केला जाईल. मृतदेहाचे शवविच्छेदन किमान तीन तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडूनच केले जाईल आणि या संपूर्ण प्रक्रियेचे ऑडिओ–व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन केले जाईल. याशिवाय न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या पथकाकडून घटनास्थळाची पाहणी, ई–साक्ष्य प्रणालीद्वारे पंचनामा आणि 'गुन्हा स्थळाची पुनर्रचना' करणे बंधनकारक असेल.

– पोलीस ठाण्यांमधील पारदर्शकता वाढवण्यासाठी प्रवेशद्वार, चौकशी कक्ष, लॉकअप आणि कॉरिडॉरमध्ये नाईट व्हिजन व ऑडिओ रेकॉर्डिंग सुविधा असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे निर्देश दिले आहेत. या फुटेजचा साठा किमान १८ महिने सुरक्षित ठेवावा लागणार आहे. कॅमेरा बंद पडल्यास त्याची तात्काळ नोंद घेऊन वरिष्ठांना कळवावे लागेल. यावर देखरेखीसाठी राज्य व जिल्हास्तरावर विशेष समित्या कार्यरत असतील.

– कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी अटक केलेल्या प्रत्येक व्यक्तीची तात्काळ वैद्यकीय तपासणी केली जाईल. नागरिकांच्या मारहाणीत जखमी झालेल्या आरोपींना कोठडीत न ठेवता आधी रुग्णालयात उपचार दिले जातील, तसेच कोठडीत असताना दर ४८ तासांनी वैद्यकीय तपासणी होईल. पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाल्यास वारसांना १ लाख रुपये, तर संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल झाल्यास १ लाख ५० हजार रुपयांच्या आर्थिक मदतीची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे.

## शेगावात बालकामगार विरोधात कारवाई; तीन बाल व किशोरवयीन कामगारांची मुक्तता

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**बुलढाणा :** बालकामगार व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ (सुधारणा २०१६) अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत कृतीदलाने शेगाव येथे धाड टाकून दोन आस्थापनांमधून तीन बाल व किशोरवयीन कामगारांची मुक्तता केली. संबंधित आस्थापनाधारकांविरुद्ध शेगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

बालकामगार या अनिष्ट प्रथेचे उच्चाटन करण्याच्या उद्देशाने २८ जुलै रोजी शेगाव शहरात विशेष धाडसत्र राबविण्यात आले. तपासणीदरम्यान खामगाव रोडवरील इंडियन मोटर गॅरेज येथे एक बालकामगार काम करताना आढळून आले. तसेच महाराष्ट्र स्प्रिंग पार्ट अँड वेल्डिंग वर्क्स या आस्थापनामध्ये दोन किशोरवयीन कामगार कार्यरत असल्याचे निदर्शनास आले. कृतीदलाने तातडीने तिन्ही बाल व किशोरवयीन कामगारांची मुक्तता करून संबंधित मालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली.

कामगार विभागाने सांगितले की, बालकामगार किंवा किशोरवयीन कामगारांना बेकायदेशीररीत्या कामावर ठेवणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा आहे. अशा प्रकरणांची माहिती कोणताही नागरिक, पोलीस अधिकारी किंवा सरकारी कामगार अधिकारी संबंधित यंत्रणेकडे देऊ शकतो. अधिनियमाच्या कलम १४ नुसार दोषी आस्थापनाधारकांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.

बालकामगारमुक्त समाज घडविण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन बालकामगारांविषयीची माहिती प्रशासनाला द्यावी आणि कोणत्याही परिस्थितीत बालकामगारांना रोजगार देऊ नये, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी, बुलढाणा यांनी केले आहे. ही कारवाई कामगार उपआयुक्त चंद्रकांत राऊत (अमरावती) व सहाय्यक कामगार आयुक्त राहुल काळे (अकोला) यांच्या मार्गदर्शनाखाली, कामगार अधिकारी शैलेश देशमुख यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत दुकाने निरीक्षक, महिला व बालविकास विभागाचे अधिकारी, कामगार विभागाचे कर्मचारी तसेच शेगाव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने सक्रिय सहभाग घेतला.

# अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्समधील जवानांना मिळणार ३० टक्के प्रोत्साहन भत्ता

## गृह विभागाचा निर्णय

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात अंमली पदार्थाचे उत्पादन, वितरण आणि अवैध तस्करीविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवणाऱ्या 'अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स'च्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. आंतरराष्ट्रीय व संघटित गुन्हेगारी टोळ्यांविरोधात स्वत:चा जीव धोक्यात घालून गुप्त कारवाया करणाऱ्या या पथकातील कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप आणि जोखीम विचारात घेऊन त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या ३० टक्के इतका 'प्रोत्साहन भत्ता' मंजूर करण्यात आला आहे.

गृह विभागाने बुधवारी यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय जारी केला असून, हा विशेष भत्ता १ ऑगस्ट २०२६ पासून लागू होणार आहे. राज्य शासनाने 'अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स'ची स्थापना करून त्यासाठी ३४६ नवीन पदांची निर्मिती केली आहे. या विभागातील अधिकारी व अंमलदार सातत्याने घातक अंमली पदार्थ हाताळणे आणि आंतरराष्ट्रीय टोळ्यांवर छापे टाकण्याचे अत्यंत धोकेदायक काम करत असतात. या कारवायांदरम्यान गंभीर दुखापत होण्याची किंवा प्राणांची जोखीम असते. त्यामुळे राज्यातील कार्यक्षम पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना या विशेष दलात आकर्षित करण्यासाठी आणि त्यांच्या कामगिरीची दखल म्हणून हा भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार 'अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स'मधील पोलिसांना मूळ वेतनाच्या ३० टक्के प्रोत्साहन भत्ता मिळणार असून, यामुळे राज्य शासनावर दरवर्षी सुमारे ५ कोटी ९० लाख ५० हजार ५०० रुपयांचा अतिरिक्त आवर्ती खर्च येणार आहे. या प्रोत्साहन रकमेवर इतर कोणतेही अतिरिक्त भत्ते लागू असणार नाहीत. तसेच, संबंधित अधिकारी अथवा कर्मचारी आपल्या मूळ पोलीस घटकात (पॅरेंट डिपार्टमेंट) परत गेल्यास हा भत्ता तात्काळ बंद करण्यात येईल, असेही गृह विभागाने स्पष्ट केले आहे.



# तुम्ही विद्यार्थ्यांवर गोळ्या झाडता; गृहमंत्री इथे येऊन बसण्याचे धाडस दाखवत नाहीत – गांधी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेत मंगळवारी पेपर लीक विरोधी विधेयकावर चर्चा सुरू झाली आणि ती आज (२९ जुलै) संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या आठव्या दिवशी बुधवारीदेखील सुरू आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी या विधेयकावरील चर्चेत सहभागी होणार असून ते दुपारी सुमारे १२:३० वाजता आपली भूमिका मांडण्याची शक्यता आहे. चर्चेनंतर या विधेयकावर लोकसभेत मतदान होण्याची शक्यता आहे. लोकसभेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर ते पुढील मंजुरीसाठी राज्यसभेत सादर करण्यात येणार आहे.



तत्पूर्वी आज बुधवारी लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी पक्षाच्या सदस्यांनी गदारोळ केला, ज्यामुळे सभागृहाचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करावे लागले. या विधेयकावरील चर्चा दुपारी १२ वाजता सुरू होण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी हे सार्वजनिक परीक्षा (दुरुस्ती) विधेयक, २०२६ लोकसभेत मांडले आहे. परीक्षांमधील पेपरफुटी, गैरव्यवहार, कॉपी तसेच इतर अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि संबंधित कायदेशीर तरतुदी अधिक कठोर करण्याच्या उद्देशाने हे विधेयक आणण्यात आले आहे.

दरम्यान, राज्यसभेत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आदल्या दिवशी सीपीएमच्या दिल्ली कार्यालयावर टाकण्यात आलेल्या छाप्याचा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी या कारवाईला लोकशाहीविरोधी पाऊल म्हणत सरकारवर टीका केली. याला उत्तर देताना सभागृहाचे नेते जे.पी. नड्डा यांनी ही घटना एक सामान्य बाब असल्याचे सांगितले आणि आपण स्वतः विद्यार्थी कार्यकर्ता असताना दोनदा अटक झाल्याचे नमूद केले.

राहुल यांच्या आरोपांना प्रतिसाद देताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षनेत्यांना आवाहन केले आणि व्यक्तींची नावे घेणे अयोग्य असल्याचे नमूद केले. दरम्यान, रिजिजू यांनी टिप्पणी केली की, जर राहुल आरोप करत असतील, तर त्यांनी पुरावे सादर केले पाहिजेत.

गृह मंत्र्यांविरुद्ध राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवरून सभागृहात गदारोळ झाला. गृह मंत्रालयावर केलेले आरोप आक्षेपार्ह असून ते विशेषाधिकार भंगासारखे असल्याचे रिजिजू यांनी म्हटले.

लोकसभेत पुन्हा एकदा गदारोळ झाला आहे. अमित शाह यांच्याबाबत केलेल्या विधानावरून सत्ताधारी पक्षाचे खासदार घोषणाबाजी करत असून, राहुल गांधींनी माफी मागावी अशी मागणी करत आहेत.

**विद्यार्थ्यांवर कोणाच्या आदेशावरून लाठीचार्ज करण्यात आला? अखिलेश यादव**

किरेन रिजिजू यांनी सांगितले की, गृहमंत्र्यांवरील राहुल गांधींचे आरोप खोटे आहेत आणि हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. यावर प्रतिक्रिया देताना, विद्यार्थ्यांनीवर कोणाच्या आदेशावरून लाठीचार्ज करण्यात आला, असा प्रश्न अखिलेश यांनी विचारला.

राहुल गांधी म्हणाले, आम्ही गृहमंत्र्यांना त्यांच्या ताफ्यात पाहिले. ते कुठे आहेत? सभागृहात बसण्याचे धाडस त्यांच्यात नाही. त्यावर अध्यक्षांनी स्पष्ट केले की, सध्या चर्चेत असलेल्या विधेयकाशी संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित आहेत आणि आजच्या चर्चेचा विषय गृह मंत्रालय नाही.

सभागृहाच्या कार्यपद्धतीनुसार, ज्या विशिष्ट विधेयकावर चर्चा सुरू असते, त्याशी संबंधित मंत्र्याची उपस्थिती असणे अपेक्षित असते.

यावर राहुल गांधींनी प्रत्युत्तर दिले, तुम्ही विद्यार्थ्यांवर गोळ्या चालवता, आणि गृहमंत्र्यांमध्ये इथे बसण्याचे धाडस नाही.या विधानामुळे लोकसभेत मोठा गदारोळ निर्माण झाला.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल गांधींचे विधान अत्यंत अयोग्य आणि अस्वीकार्य असल्याचे म्हटले. तसेच त्यांनी या दाव्याचा आधार काय, असा प्रश्न उपस्थित केला आणि गोळीबाराचे आदेश कुणी दिले, याची माहिती त्यांना कोणी दिली, अशी विचारणा केली.

सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी राहुल गांधींनी माफी मागावी अशी मागणी केली, तर दुसरीकडे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी करत गृहमंत्र्यांनी माफी मागावी, असा आग्रह धरला.

## पाकिस्तानची राज्यव्यवस्था अनेक दिशांनी ताणाखाली

स्वातंत्र्योत्तर काळापासून जम्मू–काश्मीरमध्ये फुटीरतावाद, दहशतवादाच्या माध्यमातून पाकिस्तानने आजवर जी जी विषपेरणी केली, त्या दुष्कर्मांची फळे तो सध्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये भोगताना दिसतो. तेथील विधानसभा निवडणुकांनिमित्ताने सर्वसामान्यांचे खून पाडण्यापासून ते लष्करी दडपशाहीमुळे, पुन्हा एकदा पाकविरोधात काश्मिरींचा असंतोष उफाळून आला. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास बलुचिस्ताननंतर व्याप्त काश्मीरही पाकच्या तावडीतून 'आझाद' होईल, तो दिवस दूर नाही! पाकव्याप्त काश्मीरमध्ये आज जे काही घडत आहे, ते एका निवडणुकीपुरते मर्यादित संकट नाही. हा अनेक दशकांपासून साचत आलेल्या राजकीय उपेक्षेचा, आर्थिक शोषणाचा आणि प्रशासकीय दडपशाहीचा उद्रेक आहे, असेच म्हणावे लागेल. १९४७ पासून पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या या प्रदेशाला आजतागायत पूर्ण घटनात्मक दर्जा देण्यात आलेला नाही. स्वायत्ततेच्या नावाखाली तेथील राजकीय व्यवस्था इस्लामाबादच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आली; तर जलसंपत्ती, खनिजे आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा उपयोग केवळ पाकिस्तानच्या राष्ट्रीय हितासाठी करण्यात आला. मात्र, त्या बदल्यात स्थानिकांना अपेक्षित विकास, उद्योग, रोजगार किंवा मूलभूत सुविधा मिळाल्या नाहीत. त्यामुळे वाढत गेलेली नाराजी आता उघड जनआंदोलनाच्या रूपाने समोर येत आहे. यंदाच्या पाकव्याप्त काश्मीरमधील विधानसभा निवडणुकांनी हा असंतोष आणखी स्पष्ट केला. मतदान प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत अनेक स्थानिक गटांनी बहिष्काराची भूमिका घेतली. लोकशाहीत मतदान हे व्यवस्थेवरील विश्वासाचे प्रतीक असते; परंतु जेव्हा नागरिक मतदानालाच नकार देतात, तेव्हा तो केवळ निवडणुकीवरील नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेवरील अविश्वासाचा संदेश असतो. त्यानंतर आंदोलकांवर झालेल्या गोळीबाराने परिस्थिती अधिक चिघळली. पाकिस्तानने या सर्व घडामोडींसाठी भारताला जबाबदार धरण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रत्येक अंतर्गत संकटाचे उत्तर भारतात शोधण्याची सवय आता पाकिस्तानच्या विश्वासार्हतेलाच धक्का देत आहे. तसेच या घटनांमुळे आणखी एक प्रश्न पुन्हा समोर आला आहे. मानवी हक्कांच्या मुद्द्यावर सातत्याने भूमिका घेणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आणि पाश्चात्त्य माध्यमांची भूमिका यावेळी आश्चर्यकारकपणे मवाळ दिसली. पूर्वी जम्मू–काश्मीरमध्ये एखादी घटना घडली की, तातडीने भारत सरकारविरोधी प्रतिक्रिया देणारे अनेक आंतरराष्ट्रीय मंच 'पीओके'तील हिंसाचाराबाबत मात्र तुलनेने शांत राहिले. पण, अशाप्रकारे मानवी हक्कांचे निकष प्रदेशानुसार बदलू शकत नाहीत. एका भागातील घटनांवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जाते, तर दुसऱ्या भागातील नागरिकांवरील दडपशाहीकडेही त्याच निकषांनी पाहिले गेले पाहिजे, अन्यथा जागतिक निष्पक्षतेच्या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उभे राहते. या पार्श्वभूमीवर भारतातील जम्मू–काश्मीरमध्ये गेल्या काही वर्षांत झालेले बदलही लक्षात घ्यावे लागतील. 'कलम ३७०' रद्द झाल्यानंतर सुरक्षा परिस्थितीत झालेली सुधारणा, वाढलेले पर्यटन, वेगाने उभारले जाणारे रस्ते, बोगदे, रेल्वे प्रकल्प आणि वाढती गुंतवणूक यामुळे जम्मू–काश्मीरची प्रतिमा बदलत आहे. या बदलांवर राजकीय मतभेद असू शकतात; परंतु आज भारताच्या जम्मू–काश्मीर आणि पाकिस्तानच्या ताब्यातील 'पीओके' यांची तुलना पूर्वीपेक्षा अधिक ठळकपणे होत आहे. एका बाजूला विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होणारा प्रदेश दिसतो, तर दुसऱ्या बाजूला राजकीय असंतोष आणि लष्करी दडपशाहीचा सामना करणारा प्रदेश. 'पीओके'चा प्रश्न केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित नाही. चीन–पाकिस्तान आर्थिक महामार्ग (सीपेक) या भागातून जात असल्याने त्याला सामरिकदृष्ट्याही मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे 'पीओके'वरील नियंत्रण हा पाकिस्तानसाठी केवळ अंतर्गत प्रशासकीय प्रश्न नसून, चीनबरोबरच्या त्याच्या धोरणात्मक भागीदारीचाही महत्त्वाचा घटक आहे. परिणामी, स्थानिकांच्या असंतोषाकडे केवळ कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहण्याची पाकिस्तानची भूमिका अधिकाधिक कमकुवत होत चालली आहे. याच वेळी पाकिस्तानच्या अंतर्गत परिस्थितीकडे पाहिले, तर 'पीओके'तील जनक्षोभ हा एका मोठ्या संकटाचा भाग असल्याचे दिसते. बलुचिस्तानमधील संघर्ष, खैबर पख्तूनख्वामधील असुरक्षितता, आर्थिक संकट, वाढते परकीय कर्ज, महागाई आणि राजकीय अस्थिरता, यामुळे पाकिस्तानची राज्यव्यवस्था अनेक दिशांनी ताणाखाली आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक प्रश्नासाठी भारताला जबाबदार धरणे, हा अल्पकालीन राजकीय उपाय असू शकतो; परंतु तो दीर्घकालीन उत्तर ठरू शकत नाही. याच पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे विधान विशेष महत्त्वाचे ठरते. 'कारगिल विजय दिना'निमित्त त्यांनी स्पष्ट केले की, भविष्यात पाकिस्तानशी कोणतीही चर्चा झाली, तर ती केवळ आणि केवळ पाकव्याप्त काश्मीरवरच होईल. त्यांच्या या विधानाकडे राजकीय घोषणाबाजी म्हणून पाहणे कदापि योग्य ठरणार नाही.

पान १ वरून...

## आता शेवटचं लढायचं, तुकडाच पाडायचा!

फडणवीस साहेब मराठ्यांवरच अन्याय का?

अण्णासाहेब महामंडळ तुम्ही स्थापन केलं, कर्ज फाईल घेतल्या, मंजूर केले, त्याच परतावे का देत नाहीत. सारथीच्या योजना बंद केल्यात, त्या का बंद केल्यात मराठा समाजाच्या स्वतंत्र मंत्रालयाची मागणी केली, मुख्यमंत्र्यांसाठी १५ मिनिटाचा खेळ आहे. का केले नाही? ९ ओबीसी मंत्र्यांनी मराठ्यांना स्वतंत्र मंत्रालय नको म्हणाले. ओबीसींना मंत्रालयाची काय गरज, मराठ्यांना का नाही? एसीबीसीच्या बऱ्याच जागेवर ऑप्शन नाही असं कळलं, मग पोरांनी ॲडमिशन कसे घ्यायचे फडणवीस साहेब मराठ्यांवरच अन्याय का? आता निर्णायक शेवटचे आंदोलन करावे लागेल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

२९ ऑगस्टला आपल्याला एकही मागणी माग ठेवायची नाही. सगळ्या केसेस मागे घेतल्याशिवाय हटायचं नाही. मी मागे काही दिवसापूर्वी बाजावार बसुन उपोषण केले. तेव्हा यांनी एक जीआर काढला की ओबीसीची सवलती लागू केल्यात. विखे पाटील मुख्यमंत्र्यांना सांगत आहेत की नाही ते सुद्धा माहित नाही. एकही योजना अजून लागू नाही. नेमकं सरकार मराठ्यांना मुर्खात काढतंय की कॉलेजवाले मुर्खात काढायला लागलेत तेच कळत नाही. फक्त उपसमितीच्या बैठाका सुरु आहेत, ओबीसी सवलती लागू केल्या तर त्या संबंधित मंत्रालयाला सांगा. अण्णासाहेब पाटील महामंडळ तुम्ही स्थापन केलं. अनेक मुलांनी वाहन घेतले, सिव्हिल खराब झाले, त्याचे परतावा का दिला नाही. आमचा संयम तुटेल इतकं मुर्खात नका काढू. सारथीच्या योजना बंद करत आणल्या, कागदावर सुरु आहेत. आता मुलांसमोर सोक्ष मोक्ष होणार. स्वतंत्र मराठा मंत्रालयाची मागणी केली, यांना स्थापन करायला काय अडचण आहे. मला कोण म्हणाल त्याच नाव मी २९ ऑगस्टला तुम्हाला सांगणार आहे. त्या ९ लोकांचे नाव सांगणार आहे. सरकार कुणाचाही असू द्या आपल्या मुलांना अधिकारी करा. स्वतंत्र मराठा मंत्रालयाची मागणी केली, यांना स्थापन करायला काय अडचण आहे. मला कोण म्हणाल त्याच नाव मी २९ ऑगस्टला तुम्हाला सांगणार आहे. त्या ९ लोकांचे नाव सांगणार आहे, सरकार कुणाचाही असू द्या आपल्या मुलांना अधिकारी करा, जरांगे पाटील म्हणाले की, सगळ्या पक्षाला मराठ्यांचा आदेश असला पाहिजे. २९ ऑगस्ट रोजी गावागावातले मराठे वाघासारखे तुटून पडणार आहेत. ९ मंत्र्यांनी सांगितलं की देऊ नका, मराठ्याना उपसमिती आहे म्हणून देऊ नका. ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष आहेत, मग त्यांना स्वतंत्र मंत्रालय कशाला पाहिजे, त्याचे मंत्री अतुल सावे आहे ना. मला तुमच्याकडून कामं नको पद नको जे काही द्यायचं ते मराठ्यांना द्यायचं आहे. यांनी ओबीसी आरक्षण दिलं. निवड झालेल्या मराठ्यांच्या पोरांना तुम्हाला का नियुक्त्या द्यायच्या नाही.

## एस आय आर ची कामे सिंदखेडराजा तालुक्यात युद्ध पातळीवर पण क्षेत्रीय अधिकारी असलेले मारोती थोरवे यांचा कामात हलगर्जीपणा महिनाभरापासून शी संवाद व भेटही नाहीच !

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंदखेडराजा :** सध्या संपूर्ण देशभरामध्ये एस आय आर चे काम युद्ध पातळीवर सुरू आहे यासाठी सर्वच कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत यामध्ये शिक्षक अंगणवाडी सेविका ग्रामपंचायत शिपाई तहसी–लदार उपविभागीय अधिकारी नायब तहसिलदार तलाठी ग्रामसेवक सर्वच कर्मचारी यामध्ये काम करत आहेत आणि या सर्वावर प्रत्येक विभागानुसार अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे




एस आय आर म्हणजेच मतदार याद्या पुनरावलोकन करण्याचे काम अनेक जिल्हा परिषद शिक्षक हे करत आहेत त्यामुळे शाळेवर परिणाम होत आहे परंतु सरकारने राष्ट्रीय कर्तव्य म्हणून एस आय आर चे काम करावेच लागते न केल्यास कारवाईचा इशारा सुद्धा दिला होता त्यामुळे अनेक शिक्षक हे काम करत आहेत मात्र दुसऱ्या बाजूला काही अधिकारी मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरून एस आय आर चे काम म्हणजेच राष्ट्रीय कर्तव्य व्यवस्थितपणे बजावत नसल्याचे समोर आले आहे.

त्यामुळे अत्यंत गंभीर बाब असून अशा बेजबाबदार अधिकाऱ्याकडे एस आय आर ची जबाबदारी दिल्या गेली कशी असा प्रश्न निर्माण होत आहे ,सिंदखेड राजा तालुक्यात जवळप–ास साडेचारशे पेक्षा जास्त अधिकारी कर्मचारी एसआयआर कामांमध्ये व्यस्त आहे मात्र गाव पातळीवर मतदार याद्या पुनरावलोकन करण्याचे काम हे बीए–लओ कडे दिलेलं आहे , बीएलओ हे आपले काम व्यवस्थितपणे पार पाडत आहेत मात्र काही अडचणी त्यामध्ये निर्माण होतात आणि त्या अडचणी सोडवण्यासाठी पर्यवेक्षक क्षेत्रीय अधिकारी असे विविध पद निर्माण केले आहेत मात्र यामध्ये ज्यांचे २४ जून रोजी बदलीची आदेश असताना सुद्धा त्यांचे एस आय आर मध्ये क्षेत्रीय अधिकारी म्हणून नाव समाविष्ट करण्यात आलेले अधिकारी मारोती थोरवे यांच्याकडे एस आय आर मधील क्षेत्रीय अधिकारी म्हणून जबाबदारी दिलेली आहे त्यांच्याकडे मोहाडी , सवडद पिंपळगाव सोनारा शिंदी गुंज रताळी ही गावे त्यांच्या क्षेत्रीय कामकाजामध्ये येतात.

मात्र त्यांची निवड होऊन जवळपास एक महिना होत आहे या महिन्यांमध्ये क्षेत्रीय अधिकारी असलेले मारोती थोरवे यांनी एकदाही या परिसरातील बी एल ओ यांच्या कामकाजाची साधी पाहणे किंवा त्यांची भेट सुद्धा घेतलेली नाही. त्यांच्या भेटीचे कुठल्याही प्रकारची नोंद सध्या नसल्यामुळे हा विषय अतिशय गंभीर असून याकडे सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी यांनी तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार काही बीएलओ ना माहिती विचारण्याकरता मारोती थोरवे यांनी फोन केला होता मात्र त्यांनी फोन उचलण्याची तसदी घे–तली नाही त्यामुळे बेजबाबदारपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी होत आहे.

## अभिनयापेक्षा फॉलोअर्स महत्त्वाचे? मालिका विश्वातील बदलत्या ट्रेंडवर ज्येष्ठ अभिनेत्रीने उपस्थित केला प्रश्न

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** सध्या सोशल मीडियावरील लाईक्स आणि व्ह्यूज पाहून रील स्टार्सना थेट मालिकांमध्ये कास्ट करण्याचा एक नवीन ट्रेंड सुरू झाला आहे. या बदलत्या ट्रेंडवर मराठी मालिकाविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता दिघे यांनी आपला तीव्र आक्षेप नोंदवला आहे. कलाकारांवर अन्याय : एका मुलाखतीत बोलताना प्राजक्ता दिघे म्हणाल्या, पूर्वीच्या काळात एका प्रोजेक्टमधील अभिनय पाहून दिग्दर्शक कलाकाराला दुसऱ्या भूमिकेसाठी विचारणा करायचे. आम्हाला कधी काम मागण्यासाठी फोन करावे लागले नाहीत. पण आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आता तुमच्या इन्स्टाग्रामचे फॉलोअर्स पाहून तुम्हाला कास्ट केले जाते. केवळ सोशल मीडिया फॉलोअर्स आहेत म्हणून रील स्टार्सना काम दिल्यामुळे खऱ्या आणि अनुभवी कलाकारांवर अन्याय होत आहे. केवळ प्राजक्ता दिघेच नव्हे, तर याआधी ज्येष्ठ अभिनेत्री गार्गी फुले यांनीही याच मुद्द्यावर भाष्य करत इन्फ्लुएन्सर्सच्या अभिनय क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.



१०–१० वर्षे मेहनत करून स्वत:ला सिद्ध करणाऱ्या कलाकारांची तुलना स्वत:ला कंटेंट क्रिएटर्स म्हणवणाऱ्या रील स्टार्सशी होऊ शकत नाही. ते स्टार असतील, पण कलाकार नक्कीच नाहीत, अशा शब्दांत गार्गी फुले यांनी सुनावले होते.

थोडक्यात काय तर, पडद्यावर आणि रंगमंचावर अभिनयातून प्रेक्षकांचे मनोरंजन करणे सोपे नाही. मात्र, सध्याच्या डिजिटल युगात अभिनयापेक्षा सोशल मीडियावरील लोकप्रियतेला अधिक प्राधान्य दिले जात असल्यामुळे ज्येष्ठ आणि अनुभवी कलाकारांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

## व्हायरलचा विषाणू... आणि पेटवली जाणारी तरुणाई!

NEET पासून E20 पर्यंत... प्रश्न धोरणांचा नाही, तर युवकांच्या भावनांचा आहे!

आज देशात एक वेगळंच युद्ध सुरू आहे. हे युद्ध सीमांवर नाही, तर मोबाईलच्या स्क्रीनवर लढलं जात आहे. शस्त्रं नाहीत, पण शब्द आ–हेत. गोळ्या नाहीत, पण पोस्ट आहेत. रणगाडे नाहीत, पण ट्रेंड आहेत. आणि या युद्धातील सर्वात मोठा सैनिक कोण? – देशाचा युवक.

काही दिवसांपूर्वी छएएढ पेपरफुटी प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांचा संताप उफाळून आला. त्या संतापाला कारणही होतं. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाल्याची भावना निर्माण झाली. देशभर आंदोलने झाली, प्रश्न उपस्थित झाले आणि सरकारलाही उत्तर द्यावे लागले.

आता त्याच सोशल मीडियावर E20 इंधन धोरणावरून नवा वाद उभा राहिला आहे. E20 जनता पार्टी, विविध हॅशटॅग, व्हायरल व्हिडिओ, पोस्ट आणि काही ठिकाणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या राजीनाम्याची मागणी अशा अनेक मोहिमा डिजिटल माध्यमातून वेगाने पुढे येताना दिसत आहेत.

या सर्व घडामोडींमध्ये एक प्रश्न मात्र कुणी विचारत नाही...

युवक स्वतः विचार करत आ–हेत की त्यांच्या भावना कोणीतरी नियोजनपूर्वक वळवत आहे?

आज सोशल मीडिया हा माहितीचा महासागर आहे; पण त्याचबरोबर तो अफवा, अर्धसत्य आणि भावनिक प्रचाराचाही मोठा बाजार झाला आहे. एखादी पोस्ट काही मिनिटांत लाखो लोकांपर्यंत पोहोचते. हजारो लोक ती सत्यता तपासल्याशिवाय पुढे पाठवतात. काही जण रागाने प्रतिक्रिया देतात, काही जण समर्थन करतात, तर काही जण विरोध करतात. पण या सर्व गोंधळात सत्य अनेकदा मागे पडते.

लोकशाहीत सरकारवर टीका करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. कोणत्याही धोरणा–वर प्रश्न उपस्थित करणे, आंदोलन करणे किंवा उत्तर मागणे यात काहीही चुकीचे नाही. परंतु लोकशाहीचा पाया तथ्यांवर उभा असतो, अफवांवर नाही.

आज युवकांच्या मनात असंतोष आहे. बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा, महा–गाई, शिक्षण, शेती, उद्योग, रोजगार अशा अनेक प्रश्नांनी तो त्रस्त आहे. अशा वेळी त्याच्या भावनांना दिशा




देणे सोपे असते. एका व्हिडिओने, एका भाषणाने किंवा एका व्हायरल पोस्टने त्याचा राग एका विशिष्ट दिश–ेला वळवता येतो.

इतिहास साक्षी आहे–प्रत्येक काळात तरुण शक्तीचा वापर झाला आहे. फरक इतकाच की पूर्वी सभा व्हायच्या, आता ट्रेंड होतात. पूर्वी घोषणा रंगमंचावर दिल्या जायच्या, आज त्या रील्स आणि हॅशटॅगमधून दिल्या जातात.

आज प्रत्येक पक्ष, प्रत्येक विच–ारधारा, प्रत्येक संघटना आणि अनेक स्वार्थी गट युवकांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करत आ–हेत. कारण त्यांना माहीत आहे की, युवकांच्या भावनांवर नियंत्रण मिळवले तर समाजाच्या विचारांवर प्रभाव टाकता येतो.

युवकांनी प्रश्न विचारू नयेत, असे अजिबात नाही. उलट त्यांनी अधिक प्रश्न विचारावेत. पण प्रश्न विचारण्यापूर्वी माहितीची पडताळणी करावी. कोणतीही पोस्ट शेअर करण्यापूर्वी तिचा स्रोत तपासावा. कोणताही व्हिडिओ पाहून निष्कर्ष काढण्याआधी त्यामागचे सत्य जाणून घ्यावे.

कारण आज सोशल मीडियावर प्रत्येक ट्रेंड लोकहितासाठीच असतो, असे नाही. काही ट्रेंड जनजागृतीसाठी असतात, तर काही केवळ जनमत वळवण्यासाठी.

आज देशाला आंधळे समर्थक नकोत आणि आंधळे विरोधकही नकोत. देशाला हवे आहेत विवेकाने विचार करणारे, पुराव्यावर विश्र्वास ठेवणारे आणि भावनांपेक्षा सत्याला महत्त्व देणारे नागरिक.

लोकशाही ही घोषणांनी मजबूत होत नाही; ती जागरूक नागरिकांनी मजबूत होते. ट्रेंड काही तास टिकतात, पण चुकीच्या निर्णयांचे परिणाम अनेक वर्षे भोगावे लागतात.

आजचा खरा प्रश्न E20 चा नाही... NEET चा नाही... किंवा एखाद्या नेत्याच्या राजीनाम्याचाही नाही.

खरा प्रश्न एवढाच आहे–

आपण देशाचे भविष्य घडवणारी तरुण पिढी आहोत... की सोशल मीडियाच्या अदृश्य सूत्रधारांच्या हा–तातील बाहुली बनत चाललो आ–होत?

कारण जेव्हा विचार मरतो, तेव्हा जमाव जन्माला येतो. आणि जेव्हा विवेक हरवतो, तेव्हा लोकशाही कमकुवत होऊ लागते.

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ॲक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

# शेकडो झाडांची कत्तल; वनविभागाचे दुर्लक्ष?

## गावकऱ्यांचे फोन येऊनही वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल घटनास्थळी न पोहोचल्याचा आरोप, येथे कुंपणच शेत खायला लागले

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**देऊळगाव राजा :** देऊळगाव राजा तालुक्यातील सिनगाव जहागीरखल्याळ गव्हाण रस्त्यावरील शासकीय रस्त्याच्या कडेला कोणतीही पूर्वपरवानगी न घेता विविध जातीची शेकडो झाडांची बेकायदेशीरपणे कत्तल करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून परिसरातील वनसंपदा धोक्यात आली आहे.

या बेकायदेशीर वृक्षतोडीबाबत गावकऱ्यांनी वनविभागाच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दूरध्वनीद्वारे माहिती दिल्याचे सांगितले. मात्र, गावकऱ्यांचे फोन आल्यानंतरही वनपरिक्षेत्र अधिकारी किंवा वनपाल वेळीच घटनास्थळी पोहोचले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे वनविभागाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.वनविभाग निसर्गाला हानी पोहचविणाऱ्या लाकूड माफियांना पाठीशी का घालत आहे.



एकीकडे शासन वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन आणि हरित महाराष्ट्रासाठी दरवर्षी लाखो रुपये खर्च करीत आहे. दुसरीकडे शासकीय रस्त्यालगत उभी असलेली शेकडो झाडे कोणत्याही परवानगीशिवाय तोडली जात असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय करीत होती, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

येवढ्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोडी संबंधात वनपरिक्षत्र अधिकारी देऊळगाव राजा यांनी वरिष्ठांना कळविले होते का ? सदर वृक्षतोड कोणी केली, किती झाडे तोडण्यात आली, त्यासाठी कोणती परवानगी घेण्यात आली होती का, तसेच तोडलेल्या लाकडाची वाहतूक कोठे करण्यात आली, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. संबंधित दोषी व्यक्तींवर वन कायद्यानुसार कठोर कारवाई करून वृक्षतोडीतील आर्थिक व्यवहार व संबंधितांची भूमिका तपासावी, अशी ही मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

वरिष्ठ अधिकारी बेकायदा वृक्षतोड करणाऱ्यांवर काय कारवाई करनार, आणि त्यांना अभय देणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी अन्यथा पर्यावरणाच्या रक्षणासाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

### प्रमुख मागण्या

- बेकायदेशीर वृक्षतोडीची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करावी.
- तोडण्यात आलेल्या झाडांची प्रत्यक्ष मोजणी करून पंचनामा करावा.
- दोषी व्यक्तींवर वन कायद्यानुसार कठोर कारवाई करावी.
- तोडलेल्या लाकडाचा शोध घेऊन ते जप्त करावे.
- संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणाची चौकशी करावी.
- भविष्यात अशा वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी शासनाने उपाय योजना तयार करावी

## विद्यार्थ्यांसमोर शिक्षकाला दमदाटी; शासकीय कामात अडथळा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**डोणगाव :** डोणगाव येथून जवळच असलेल्या ग्राम राजगड येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांसमोर शिक्षकाशी अरेरावी करत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध डोणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस माहितीनुसार, संजय यादव घायाळ (वय ५१), शिक्षक, जि.प. शाळा राजगड यांनी दिलेल्या तक्रारीवरून संदीप भावरा हाडे (वय ३२, रा. राजगड, ता. मेहकर) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, २९ जुलै २०२६ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास, शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत असताना आरोपीने वर्गात येऊन मोठमोठ्याने बोलत वाद घातला. शिक्षकांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने ऐकून न घेता गोंधळ घालत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणाची नोंद डोणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोहेकॉ इश्र्वर सोनुने करीत आहेत.

## कारगिलच्या शौर्यगाथेतून राष्ट्रसेवेची प्रेरणा; जनता महाविद्यालयात सुभेदार मेजर दिनेश तायडे यांचे मार्गदर्शन



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** कारगिल विजय दिनानिमित्त जनता कला व वाणिज्य महाविद्यालय, मलकापूरच्या एनसीसी विभागात आयोजित कार्यक्रमात कारगिल युद्धातील सहभागी व भारतीय सैन्याचे सुभेदार मेजर दिनेश महादेवराव तायडे (सेवानिवृत्त) यांनी एनसीसी कॅडेट्सना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी माजी एनसीसी विद्यार्थी पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप यदमल यांचाही सत्कार करण्यात आला. सुभेदार मेजर तायडे यांनी कारगिल युद्धातील अनुभव, युद्धानंतर सहा वर्षांहून अधिक काळ लाईन ऑफ कंट्रोलवरील सेवा आणि शहीद झालेल्या १४ सहकाऱ्यांच्या बलिदानाची आठवण करून देत विद्यार्थ्यांना राष्ट्रसेवा, शिस्त, नेतृत्व व देशभक्तीचा संदेश दिला. त्यांनी भारतीय सैन्यात अधिकारी म्हणून करिअर करण्याचे आवाहन करत, ''राष्ट्र प्रथम, कर्तव्य सर्वोच्च'' हा मंत्र प्रत्येक युवकाने स्वीकारावा, असे सांगितले. तायडे यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतिसेनेत इथिओपिया-इरिट्रिया तसेच भूतानमध्ये भारतीय सैन्याचे प्रतिनिधित्व केल्याची माहितीही दिली. त्यांच्या प्रेरणादायी अनुभवांमुळे एनसीसी कॅडेट्समध्ये भारतीय सैन्याबद्दल अभिमान व राष्ट्रसेवेची नवी प्रेरणा निर्माण झाली. कार्यक्रमास प्राचार्य प्रा. इंगोले सर, एनसीसी अधिकारी प्रा. लेफ्टनंट वाय. एस. राजपूत सर तसेच विविध महाविद्यालयांतील एनसीसी अधिकारी व कॅडेट्स उपस्थित होते.

## जन्म-मृत्यू नोंदणी आता केवळ CRS Portal द्वारेच; समांतर प्रणाली वापरण्यास बंदी

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार जन्म व मृत्यू नोंदणीची संपूर्ण प्रक्रिया आता भारत सरकारच्या Civil Registration System (CRS) Portal द्वारेच राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात सर्व निबंधक, उपनिबंधक तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

शासनाच्या निर्देशानुसार जन्म व मृत्यू नोंदणीसाठी CRS Portal व्यतिरिक्त कोणतीही स्वतंत्र, स्थानिक अथवा समांतर सॉफ्टवेअर प्रणाली वापरता येणार नाही. यापूर्वी नोंद न झालेल्या जन्म किंवा मृत्यू घटनांची नोंद 'Add Old Event' या सुविधेद्वारे CRS Portal वर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच जन्म व मृत्यू नोंदीतील दुरुस्ती, अद्ययावत माहिती, प्रमाणपत्र निर्गमित करणे तसेच इतर सर्व सेवा केवळ CRS Portal मार्फतच उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी उपलब्ध मूळ अभिलेखांच्या आधारे अचूक माहिती नोंदवून नियमानुसार कार्यवाही करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील जन्म व मृत्यू नोंदींचा एकसंध डिजिटल डेटाबेस तयार होण्यास मदत होणार असून नागरिकांना अधिक पारदर्शक, अचूक आणि सुलभ सेवा उपलब्ध होणार आहे. तसेच समांतर प्रणालीचा वापर केल्याचे आढळल्यास संबंधितांवर प्रचलित नियमांनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

## सीपीआर प्रशिक्षणामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांची आपत्कालीन प्रतिसाद क्षमता अधिक बळकट



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** राज्य शासनाच्या 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत समग्र प्राथमिक आरोग्य सेवा (CPHC) अंतर्गत कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन (CPR) विषयावरील प्रशिक्षण सत्र प्राथमिक आरोग्य केंद्र, शेलगाव आटोळ येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाले. या प्रशिक्षणामध्ये अचानक हृदयक्रिया बंद पडलेल्या रुग्णाला तातडीने जीवदान देण्यासाठी आवश्यक असलेल्या सीपीआर तंत्राचे सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. सहभागी आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीचे मूल्यमापन, योग्य पद्धतीने छातीवर दाब (Chest Compression), कृत्रिम श्वसन (Rescue Breathing) तसेच रुग्णाला वेळेत पुढील उपचारासाठी संदर्भित करण्याच्या प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणासाठी डॉ. शिवानंद शिंगाडे, डॉ. संतोष सांगळे, डॉ. शैलेश खंडारे, डॉ. जीवन भारती, सुवर्णा बेलसरे, स्वाती शेंद्रे, कविता खाडे, सुनिता जवंजाळ आणि सुलोचना पराड यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषद प्रशिक्षण केंद्राच्या डॉ. स्नेहा पाटील, डॉ. वायाळ, डॉ. पैठणे, डॉ. गवाटे आदी उपस्थित होते.

या प्रशिक्षणामुळे आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आणि प्रभावी प्रतिसाद देण्याची क्षमता अधिक सक्षम होणार असून, नागरिकांना वेळेवर, दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## हर्षवर्धन सपकाळांच्या अडचणी वाढणार? गुन्हा दाखल; मानहानीची नोटीस पाठवण्याचा अभिमन्यू पवारांचा इशारा

**मुंबई :** राज्याच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून मोठ्या घडामोडी सुरू आहेत. यातच टीईटी पेपरफुटी प्रकरणाचा मुद्दा चर्चेत आला असतानाच एका विद्यापीठात बनावट डिग्री सर्टिफिकेट देणारं रॅकेट उघडकीस आलं आहे. यावरून शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत हे आक्रमक झाले आहेत. या पार्श्र्वभूमीवर संजय राऊत यांनी एक पोस्ट शेअर करत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

संजय राऊत यांनी म्हटलं की, ''महाराष्ट्रात शिक्षणाच्या आय चा घो झाला आहे. साधारण २००० सरकारी शाळा निधी अभावी बंद पडल्या आहेत. विद्यापीठात आणि शालेय बोर्डात बोगस डिग्री आणि आणि मार्कशीट्सचा बाजार भरला आहे. राज्यात शिक्षणाची अत्यंत खराब अवस्था असतानाच शालेय शिक्षण मंत्री कार्यालयातून एक धक्कादायक माहिती समोर येत आहे. शासनाच्या धोरणामुळे खासगी संस्थाचालकांचे कंबरडे मोडले असतानाच स्वयंअर्थसहाय्यित शाळेच्या अंतिम मंत्र्यांच्या मान्यतेला तब्बल पाच ते दहा लाख रुपये घेऊन मान्यता मिळत आहे. तसेच तुकडी वाढीसाठी आठ लाख रुपये व शाळेच्या इरादा पत्रासाठी पाच लाख रुपये दिल्याशिवाय मंत्री कार्यालयात मंत्र्यांचे ओएसडी महाशय उभा ही करत नसल्याची माहिती मिळत आहे. तसेच पैसे घेऊनही सहा-सहा महिने संस्था चालकांना मंत्री कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असल्याचं कळतं आहे. मी मंत्री महोदयांचा पाहुणा असल्याने मला कोणीही काही करू शकत नसल्याचा अविर्भाव या ओएसडीकडे ठासून भरलेला दिसून येतो. संस्थाचालकांना एक शाळा उभा करण्यासाठी करोडो रुपयांचा खर्च येत असताना शालेय शिक्षण विभागाच्या व्यवस्थेकडून सर्व अधिकारी व मंत्र्यांच्या मान्यतेसाठी तब्बल ५० लाखाचा खर्च येत असल्याने शाळेच्या संस्था कशा उभा करायचा असा प्रश्न संस्थाचालकांना पडला आहे असे गंभीर आरोप संजय राऊत यांनी केले आहेत.

## तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार; २० ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविले

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** भारत सरकार युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय मार्फत साहसी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान करण्यात येणाऱ्या तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार (Tenzing Norgay National Adventure Award - TNNAA) 2025 साठी नामांकन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इच्छुक खेळाडू व पात्र उमेदवारांनी दि. ३० जुलै ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत केंद्र शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे यांनी केले आहे.

साहसी क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यासाठी हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सामान्यतः जमिनीवरील, समुद्रावरील आणि हवाई साहसी उपक्रमांमध्ये प्रत्येकी एक पुरस्कार दिला जातो. तसेच साहसी क्षेत्रातील 'आजीवन योगदान' (Lifetime Achievement) या विशेष श्रेणीसाठीही स्वतंत्र पुरस्कार प्रदान करण्यात येतो. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार पुरस्कारासाठी नामांकन करणाऱ्या खेळाडूंची सन २०२३, २०२४ आणि २०२५ या तीन वर्षांतील कामगिरी विचारात घेतली जाणार आहे. संबंधित कामगिरी ही जमीन, पाणी किंवा हवाई साहसी उपक्रमांतील असून ती अतिउत्कृष्ट स्वरूपाची असणे आवश्यक आहे.

तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कारासाठी नामांकन प्रस्ताव केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. अर्ज https://awards.gov.in/ या केंद्र शासनाच्या पोर्टलवर सादर करावेत. मंत्रालयाकडे ऑफलाइन प्राप्त होणाऱ्या अर्जांची कोणतीही दखल घेतली जाणार नाही व असे अर्ज थेट नाकारले जातील, असेही श्रीमती आंब्रे यांनी स्पष्ट केले आहे. इच्छुक खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत अर्ज सादर करून या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मैदान खेळाच्या मैदानासाठी ठेवा; उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंदखेडराजा :** मौजे साखरखेर्डा ता. सिंदखेडराजा येथील गट क्रमांक ७९० किंवा ८४२ मधील १.६२ हे. आर चे प्ले ग्राउंड कायमस्वरूपी खेळाडूंसाठी आरक्षित ठेवण्यात यावे, अशी मागणी गावातील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खेळाडूंचे मैदान हे सरकारी असून, खरेदी खताच्या आधारे ते हडप करण्याचा प्रयत्न केला आहे. साखरखेर्डा गावाच्या हद्दीतील शासकीय गट क्रमांक ७९० किंवा ८४२ मधील १.६२ हे. आरचे हे मैदान अनेक वर्षांपासून ग्रामस्थांनी श्रमदानातून विकसित केले आहे.

ग्रामस्थ आणि खेळाडूंसाठी खेळण्यासाठी हे सार्वजनिक मैदान आहे. त्यामुळे मैदानाचे संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे.



तसेच उपविभागीय अधिकारी तहसीलदार उपाधीक्षक भूमी अभिलेख सिनखेडराजा यांना सुद्धा निवेदन देण्यात आले आहे यावेळी विशाल गवई श्याम खरात संदीप मगर अंकुर देशपांडे उपस्थित होते यासाठी शेकडो ग्रामस्थांच्या सह्या असलेले निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. तसेच ग्रामसभेत सर्वानुमते ठराव मंजूर करून घेण्यात आला आहे.

# रेशन दुकानांचे होणार मिनी सुपरमार्केट मध्ये रूपांतर

## महाउद्यमी स्किल्स आणि रिअल मार्ट उपक्रमाबाबत पुरवठा अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**साखरखेर्डा :** शासकीय स्वस्त धान्य दुकानांना आता केवळ धान्य वाटपापुरते मर्यादित न ठेवता, त्यांचे आधुनिक मिनी सुपरमार्केट आणि मल्टि-सर्व्हिस सेंटरमध्ये रूपांतर करण्यासाठी शासन व प्रशासकीय पातळीवर वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर दि. २८ जुलै रोजी सिंदखेडराजा तालुक्यातील सर्व रेशन दुकानदार आणि तालुका पुरवठा अधिकारी () यांची एक महत्त्वपूर्ण संयुक्त बैठक पंचायत समिती सिंदखेड राजाच्या सभागृहात संपन्न झाली.

या बैठकीत महाउद्यमी स्किल्स लिमिटेड आणि रिअल मार्ट उपक्रमांतर्गत रेशन दुकानदारांचे उत्पन्न वाढवणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली.



तालुका पुरवठा अधिकारी विवेक जगताप ह्यांनी या बैठकीस मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, रेशन दुकानदारांना सध्या मिळणारे कमिशन मर्यादित आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाच्या धोरणानुसार आता रेशन दुकानांचे स्वरूप बदलण्यात येत आहे. महाउद्यमी स्किल्स आणि रिअल मार्टच्या माध्यमातून दुकानदार त्यांच्या दुकानात दैनंदिन गरजेच्या दर्जेदार वस्तू (साबण, तेल, मसाले, डिटर्जंट इत्यादी) तसेच स्थानिक महिला बचत गटांनी तयार केलेली उत्पादने ते विकू शकतील. ज्यामुळे रेशन दुकानदारांना हक्काचा अतिरिक्त व्यवसाय उपलब्ध होईल. ग्राहकांना एकाच छताखाली सर्व साहित्य मिळण्याबरोबरच रेशन दुकानदारांना उत्पन्नाचा नवा स्रोत उपलब्ध होईल.

तहसीलदार अजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कर्यक्रमात निरीक्षण अधिकारी शुभम फाले, पुरवठा निरीक्षक विवेक जगताप, स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष तोरण आगरी व सर्व पदाधिकारी तसेच तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदार उपस्थित होते.

### महिला बचत गट आणि स्थानिक उत्पादनांना मिळणार मोठी बाजारपेठ

महाउद्यमी स्किल्स लिमिटेडच्या प्रतिनिधींनी या बैठकीत डिजिटल कॉमर्स सोल्यूशन्स आणि त्यांच्या ७५,००० + किरकोळ विक्री नेटवर्कची माहिती दिली. तालुक्यातील जे रेशन दुकान किंवा केंद्र महिला स्वयंरोजगार गटांद्वारे () चालवले जाते, त्यांच्या उत्पादनांना थेट रिअल मार्ट ब्रँड अंतर्गत पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि विक्रीची सुविधा दिली जाईल, यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

# सनातन कावड यात्रेचे प्रयागराज येथून साखरखेर्डाकडे मार्गस्थ : शिवभक्तांची दररोज ४० ते ५० किमी पायी यात्रा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**साखरखेर्डा :** येथील हिंदू सूर्य महाराणा प्रताप मित्र परिवाराच्या वतीने आयोजित कावड यात्रेचे प्रयागराज येथून पवित्र गंगाजल घेऊन निघालेल्या पायी कावड यात्रेचा परतीचा पायी प्रवास सुरु झाला असून पवित्र कावड यात्रेचे दि. २४ ऑगस्ट रोजी साखरखेर्डा गावात आगमन होणार आहे.



कावड यात्रा म्हणजे महादेवाबद्दलची अथांग भक्ती आणि समर्पणाची एक अद्वितीय साधना. कावड यात्रा ही प्रामुख्याने श्रावण महिन्यात शिवभक्तांद्वारे काढली जाणारी एक अतिशय खडतर आणि पवित्र पदयात्रा आहे. तसेच प्रयागराज हे भारतातील सर्वात पवित्र धार्मिक स्थळांपैकी एक असून पवित्र नद्यांच्या संगमाचे मोक्षदायी स्थान आहे.

स्थानिक हिंदू सूर्य महाराणा प्रताप मित्र परिवाराने यावर्षी याच प्रयागराजची निवड करत तेथून पवित्र गंगाजल आणण्याचा निश्चय केला आहे. दि. २४ जुलै रोजी प्रयागराज येथून या सनातन कावड यात्रेची पायी यात्रा सुरु झाली. तब्बल १००८ किमी चा पायी खडतर प्रवास आणि एक महिन्याच्या प्रदीर्घ कालावधीमुळे ही यात्रा या शिवभक्तांसाठी अविस्मरणीय ठरत आहे.

प्रयागराज येथील पवित्र गंगा नदीचे जल घेऊन 'सनातन कावड यात्रा' तब्बल १००८ किमी चा लांबलचक पायी प्रवास करत साखरखेर्डाच्या दिशेने मार्गस्थ झाली असून सद्या कटनी (म.प्र.) पर्यंत पोचली आहे. भक्ती आणि श्रद्धेचा हा अभूतपूर्व संगम सध्या यात्रेच्या रूपाने पाहायला मिळत असून ही कावड यात्रा आगामी २४ ऑगस्ट रोजी साखरखेर्डा येथे दाखल होणार आहे. कावडधारकांचा हा प्रवास अत्यंत कठीण असून ते दररोज ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता ४० ते ५० किलोमीटरचे अंतर पार करत आहेत. खांद्यावर गंगाजलाची कावड आणि मुखात शिवनामाचा गजर करत सर्व कावडधारक अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहाने पुढे जात आहेत. या कावड यात्रेच्या मार्गात ठिकठिकाणी भाविकांकडून कावडधारकांचे जोरदार स्वागत केले जात आहे.

या पवित्र कावड यात्रेत जीवनसिंग राजपूत, रामदाससिंग राजपूत, बादलसिंग राजपूत, इंद्रपालसिंग राजपूत, बीरबलसिंग राजपूत, संग्रामसिंग राजपूत, पीलूमामा ठाकूर, चरणसिंग राजपूत, मंगलसिंग राजपूत, प्रतापसिंग राजपूत, प्यारेलालसिंग राजपूत, पवनसिंग राजपूत, बबु ठाकुर, विनोदसिंग राजपूत, आशिष कामे,विशाल राजपूत, मुकेश राजपूत, लखन राजपूत, मोहन राजपूत, लखन रामावत, गजानन बेलोकर,शुभम राजपूत, राहुल राजपूत, प्रसाद स्वामी, कृष्ण पारधे, मनोज राजपूत, मंगेश कामे, राजू जोशी आदी शिवभक्त सहभागी झाले आहेत.

## महाराजस्व अभीयानात संगायोची ६७६ प्रकरणे मंजूर : लाभार्थ्यांना ऑन द स्पॉट प्रमाणपत्र वाटप



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**साखरखेर्डा :** सिंदखेडराजा येथे नुकत्याच संपन्न झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभीयानामध्ये संजय गांधी निराधार योजना विभागात ६७६ लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर करण्यात आली असून अनुदान पाठविण्याची कार्यवाही चालू आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वाढदिवस तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त दि. २२ जुलै रोजी राज्यभर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभीयान राबविण्यात आले. मातोश्री लॉन सिंदखेडराजा येथे झालेल्या अभियानात संजय गांधी निराधार योजनेत दि. १ एप्रिल २०२६ पर्यंतच्या ऑनलाईन केलेली ६७६ प्रकरणे मंजूर करुन काही लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

या कामी महसूल अधिकारी जी.के.नागरे, सहाय्यक परमेश्वर नवगीरे आणि मनोज देशमुख यांनी विषेश प्रयत्न केले. सदर कार्यक्रमाला सिंदखेडराजा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसिलदार अजीत दिवटे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील लाभार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## डोणगाव येथे भाजपच्या वतीने संत शिरोमणी श्री गुरु रोहीदास महाराज संकल्पना अभियान व गुरुपौर्णिमा उत्सव साजरा; विविध उपक्रमांचे आयोजन



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**डोणगाव :** भारतीय जनता पार्टी डोणगावच्या वतीने संत शिरोमणी श्री गुरु रोहीदास महाराज संकल्पना अभियानांतर्गत विविध सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या अभियानाचे औचित्य साधून परिसरात भव्य स्वच्छता अभियान राबवण्यात आले, तसेच गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुपूजन आणि संत रोहीदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे तालुकाध्यक्ष विलास परमाळे हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये ओबीसी मोर्चाचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर आजगर, भाजप तालुका उपाध्यक्ष संतोष पांडव आणि तालुका सरचिटणीस विक्रम धोंगडे यांची मुख्य उपस्थिती होती.स्वच्छता आणि भक्तीचा त्रिवेणी संगम'संत गुरु रोहीदास महाराज संकल्पना अभियाना'चा भाग म्हणून भाजप कार्यकर्त्यांनी परिसरात स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छतेचा संदेश दिला. त्यानंतर आयोजित मुख्य कार्यक्रमात संत रोहीदास महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन आणि आरती करण्यात आली.

तसेच गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून ज्येष्ठ वंदनीय गुरूंचे पूजन करून त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले.मान्यवरांची आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थितीया प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते गणेशजी भांगे, देविदास चव्हाण, मोहन मोरे, बशीरे साहेब, रामेश्वर पांडव, स्वप्निल कळसकर, गणेश चव्हाण यांच्यासह परिसरातील असंख्य भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन भाजप मंडळ डोणगावच्या वतीने चोखपणे करण्यात आले.

# वरुडमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ! एकाच रात्री पाच ठिकाणी घरफोड्या; पोलिसांसमोर मोठे आव्हान

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**डोणगाव :**डोणगाव पोलीस स्टेशन हद्दीतील वरुड गावात मंगळवार (दि. २८ जुलै) च्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत एकाच रात्री पाच ठिकाणी घरफोड्या केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कुलूपबंद घरे तसेच घरात लोक झोपलेले असतानाही चोरट्यांनी हात साफ केल्याने नागरिकांमध्ये प्रचंड दहशत पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरी झालेल्या घरांपैकी तीन कुटुंबे कामानिमित्त पुणे येथे गेली होती, तर दोन घरांमध्ये कुटुंबीय दुसऱ्या खोलीत झोपलेले असतानाच चोरट्यांनी घरात प्रवेश करून ऐवज लंपास केला. त्यामुळे चोरट्यांची धाडसी पद्धत पाहता नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या चोरीच्या मालिकेत सुवर्णा राठोड, शेषराव राठोड, प्रकाश रतन पवार आणि गोविंदा अमरसिंग पवार यांच्या घरांना चोरट्यांनी लक्ष्य केले. गोरगरीब कुटुंबांच्या घरातील हाताशी असलेले मौल्यवान साहित्य व रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती समोर येत आहे.

चोरीचा नेमका ऐवज आणि नुकसानाचा पंचनामा सुरू असल्याने अंतिम आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक विजय अजमिरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पोलिसांनी तपास सुरू केला असला तरी बातमी लिहीपर्यंत डोणगाव पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता.







सलग पाच ठिकाणी झालेल्या घरफोड्यांमुळे वरुडसह परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, या चोरट्यांचा तातडीने छडा लावून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. एकाच रात्री घडलेल्या या धाडसी चोरीच्या मालिकेमुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

# नवनियुक्त ठाणेदारांची मोहना बु. येथे धडक कारवाई; हातभट्टी दारूचे अड्डे केले उद्ध्वस्त

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**जानेफळ :** कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या तसेच अवैध धंद्यांवर आळा घालण्याच्या उद्देशाने नवनियुक्त ठाणेदार शरद माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने मोहना बु. या दुर्गम भागात अचानक धाडसत्र राबविले. सकाळी साडेपाच वाजता सुमारास या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.



या कारवाईदरम्यान गावातील हातभट्टीची गावठी दारू विक्री करणाऱ्या संशयितांच्या घरांची सखोल तपासणी करण्यात आली. तसेच नदीकाठालगत सुरू असलेले गावठी दारूचे अड्डे पोलिसांनी पूर्णपणे उद्ध्वस्त केले. धाडीदरम्यान लपवून ठेवलेली अंदाजे २५ ते ३० हजार रुपये किमतीची हातभट्टीची गावठी दारू गावातील महिला पंचांच्या समक्ष जागच्या जागी नष्ट करण्यात आली.

याप्रकरणी संबंधित अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

ही यशस्वी कारवाई ठाणेदार शरद माळी यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार हेड कॉन्स्टेबल काकड, हेड कॉन्स्टेबल पवार, पोलीस कॉन्स्टेबल पाटोळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल निता पवार आणि चालक येमले यांच्या पथकाने केली.

मोहना बु. येथे अनेक वर्षांनंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवैध हातभट्टी दारूविरोधात प्रभावी कारवाई झाल्याने गावातील महिलांनी मोठे समाधान व्यक्त केले असून, पोलीस प्रशासनाच्या या धाडसी मोहिमेचे स्वागत केले आहे.

भविष्यातही अवैध धंदे, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि समाजविघातक कृत्यांविरुद्ध अशाच प्रकारच्या कठोर व सातत्यपूर्ण कारवाया सुरू राहणार असल्याचा निर्धार पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## चोरट्यांचा कळस! डोणगावच्या कांचनगंगा हिंदू स्मशानभूमीतून लोखंडी साहित्याची चोरी; संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**डोणगाव :** मेहकर तालुक्यातील डोणगाव येथील कांचनगंगा हिंदू स्मशानभूमी परिसरातून लोखंडी खिडकी व अँगल चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी डोणगाव पोलीस ठाण्यात संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागोराव सुफाजी टाले (वय ७६, रा. डोणगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून शेख मुस्ताक शेख गफ्फार (रा. डोणगाव) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, २२ जुलै २०२६ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास कांचनगंगा हिंदू स्मशानभूमी परिसरात बसविण्यात आलेली लोखंडी खिडकी व अँगल, अंदाजे ४,८०० किमतीचे साहित्य चोरी करण्यात आले. चोरी केलेले साहित्य संशयिताने स्वतःच्या गोठ्यात नेऊन ठेवल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर डोणगाव पोलिसांनी प्रकरणाची नोंद घेत तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ संजय घिके करीत असून, चोरीमागील नेमके कारण आणि इतर बाबींचा शोध घेतला जात आहे.

# जी. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा गोरेगावचा डंका; शिष्यवृत्ती परीक्षेत ९ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंदखेडराजा :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, गोरेगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

शाळेतील एकूण ९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवत गुणवत्ता सिद्ध केली असून, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळाही गुणवत्तेच्या बाबतीत कोणत्याही खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षा कमी नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेत कु. जान्हवी नितीन गवई व कु. नीलम विजय कव्हळे यांनी प्रत्येकी २४६ गुण (८२ टक्के) मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. तर पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) शिष्यवृत्ती परीक्षेत अनिकेत राजेंद्र बाजड, कु. खुशी संजय इरसे, प्रतीक सतीश गवई, कु. पुष्पा बिरजू कव्हळे, रोशन श्रावण कव्हळे, समर्थ शाम चिंचोले आणि शौर्य समाधान गवई यांनी यश मिळवत शाळेचा गौरव वाढविला.

विद्यार्थ्यांच्या या यशानिमित्त सेवानिवृत्त मुख्याध्यापक अत्तरखान शहजाद खान पठाण यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष भेट देऊन त्यांचा सत्कार व अभिनंदन केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला. या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक गाडगे सर यांचे प्रभावी नेतृत्व तसेच कंकाळ सर, गवई सर आणि मोरे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.




शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करत भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर मिळवलेले हे यश निश्चितच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, गोरेगाव येथील जिल्हा परिषद शाळेने गुणवत्तेचा झेंडा पुन्हा एकदा अभिमानाने फडकावला आहे.